## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची गुरुवार दि. १० जूलै २००८ रोजी झालेल्या १०९ व्या बैठकीचे कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १०९ वी बैठक गुरुवार दि.१० जूलै २००८ रोजी सकाळी ११.३० वा. गृहनिर्माण भवनातील तिसऱ्या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. आमदार श्री. सचिन अहिर | सभापती |
| २. | मा. श्री. तानाजी सत्रे, भा.प्र.से. | उपसभापती तथा मुख्य अधिकारी |
| ३. | मा. श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ४. | मा. श्री. नंदकुमार काळे | सदस्य |
| ५. | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ६. | मा. श्री. तारीक फारुकी | सदस्य |
| ७. | मा. श्रीमती. सुरेखा पाटील | सदस्य |
| ८. | मा. श्री. व्ही.जी. नायर | सदस्य |
| ९. | मा. श्री. दिलीप शिंदे, उपसचिव गृहनिर्माण विभाग | सदस्य |
| १०. | उपकर निर्धारक व संकलक, म.न.पा. यांचे प्रतिनिधी | निमंत्रक |
| ११. | निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळाचे सचिव श्री. व्ही.जी.वाणी यांनी मा.सभापती व मा. सदस्य यांचे स्वागत करुन मंडळाची १०९ वी बैठक सुरु करीत असल्याचे जाहीर केले. व मंडळाच्या दि.१६ मे २००८ रोजी झालेल्या १०८ व्या बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी मंडळासमोर सादर केले.

**बाब क्रमांक : १०९/१ -**

विषय- दि.१६ मे २००८ रोजी झालेल्या १०८ व्या बैठकीचा कार्यवृतांत स्थायी करण्याबाबत.

---

सदर कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते ९ वर सादर करण्यात आला आहे.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, ह्या विषयसूची सोबत कार्यपूर्ती अहवाल सादर करण्यात आलेला नाही. ह्यावर सचिव यांनी कार्यपूर्ती अहवाल तयार असून ऑन टेबल सादर करण्यात येत आहे अशी माहिती दिली.

मा. सभापती यांनी अशी सूचना केली की, मा. सदस्यांनी प्रथम कार्यवृत्तांत स्थायी करुन घ्यावे व नंतर कार्यपूर्ती अहवालावर चर्चा करण्यात यावी.

वरील सविस्तर चर्चेअंती १०८ व्या बैठकीचे कार्यवृत्त सर्वानुमते स्थायी करण्यात आले.

---

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी इमारत क्रमांक ६०२-६१०,६०६अे ६०६बी " सकिना मंझील " ना.म.जोशी मार्ग ई विभाग या इमारतीस त्यांनी भेट दिली होती. सदर इमारतीच्या वाढीव खर्चास मंडळाची मंजुरी का घेण्यात आली नाही अशी विचारणा करुन याबाबत खुलासा देण्याची सुचना केली.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, मागील बैठकीत असे ठरले होते की, प्रथम इमारतीची पाहणी करुन घ्यावी त्यानंतर सदर विषय मंजूरीसाठी पुढील बैठकीत ठेवावा. असे असताना मंडळाच्या मुख्य लेखाधिकारी यांनी निधी मंजूर कसा केला?

यावर श्री. लोहकरे, उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) यांनी असा खुलासा केला की, वाढीव कामाच्या खर्चाची बिले ही अंतरिम देयकामध्ये (आर.अे.बिलामध्ये) घेऊन त्याचे पेमेंट होत होते. नंतर जेव्हा अंतिम देयक तयार करण्यात येते ते सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी मंडळासमोर आणले जाते अशी पध्दत आहे. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आलेल्या प्रस्तावामध्ये वेळोवेळी देण्यात आलेली बिले, शिल्लक बिले इत्यादी माहिती दिली आहे काय याची खात्री करण्यात यावी तसेच सुधारित प्रशासकीय मान्यता दिल्याशिवाय पुढील पेमेंट करण्यात येऊ नये असे मागील बैठकित ठरले असताना पेमेंट कसे काय केले आणि सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्याच्या आधीन राहून पेमेंट करण्याची पध्दत असेल तर तसे प्रस्तावात नमूद केले आहे का ? जे पेमेंट झाले ते कोणत्या अधिकारात करण्यात आले याची माहिती देखील प्रस्तावात नमूद करण्यात यावी.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी असे मत व्यक्त केले की, जर अधिका-यांनी टप्प्याटप्प्याने बिले मंजूर केली असतील तर त्याची माहिती प्रस्तावात देणे आवश्यक होते. त्यांनी जेव्हा इमारतीस भेट दिली तेव्हा त्यांना कळून आले की, टप्याटप्याने बिले आधीच मंजूर झाली आहेत. जर बिले आधीच मंजूर करण्यात आली आहेत तर मग मंडळाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव का ठेवण्यात आला?

यावर मा. सभापती यांनी असे नमूद केले कि, मागील बैठकीत जेव्हा प्रस्ताव सादर करण्यात आला होता तेव्हा वाढीव खर्चास मंडळाच्या मान्यतेची आवश्यकता आहे. तसेच अधिकचा खर्च का झाला याची प्रत्यक्ष पाहणी करुन नंतर सदर खर्चास मान्यता मिळण्यासाठी मंडळासमोर पुढील बैठकीत प्रस्ताव ठेवण्यात येईल अशी मा. सदस्यांची समजूत झाली होती. परंतु मुख्य अधिकारी यांनी सांगितल्याप्रमाणे वाढीव खर्चाची रक्कम अदा करणे ही तांत्रिक बाब आहे व तशी पध्दत असेल तर त्याची माहिती प्रस्तावात द्यावयास पाहिजे होती. मा. सभापती यांनी असेही मत मांडले की, प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव मंडळासमोर सादर करावयाचा आणि मंडळाच्या मंजुरीशिवाय वाढीव खर्चाची पेमेंट करायची ही पध्दत योग्य आहे कि अयोग्य आहे याची तपासणी मुख्य अधिकारी यांनी करुन पुढील बैठकीत त्याची माहिती द्यावी अशा सूचना दिल्या.

श्री. त्रिवेदी, उ.मु.अभि.(उत्तर) यांनी असे निदर्शनास आणले की, पध्दत अशी आहे की, योजना चालू करण्यापूर्वी, भुसंपादनापूर्वी प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली असते. एकदा काम

सुरु झाले की जो अधिकचा खर्च येतो त्याला प्रत्येक वेळी मान्यता न घेता काम संपल्यानंतर अंतिम बिलासाठी मंडळाची मान्यता घेण्यात येते. अशाप्रकारे पहिल्यांदा आणि अंतिम बिलाला मान्यता घेण्याची पध्दत आहे.

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, सुरुवातीला ज्या खर्चासाठी मान्यता घेण्यात आली आहे तो खर्च व आता अंतिम बिलासाठी मान्यता घेण्यात येत असलेला खर्च पाहता दोन्ही खर्चामध्ये काही कोटी रुपयांची तफावत दिसून येते. हा फरक किती टक्क्यांनी आहे अशी विचारणा केली असता श्री. लोहकरे, उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) यांनी खुलासा केला की, पूर्वीच्या खर्चापेक्षा आता दुप्पट खर्च झाला आहे. यावर मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी असे मत व्यक्त केले की, हा खर्च दुप्पट असून सदर खर्च केवळ माहितीसाठी मंडळासमोर ठेवण्यात आला आहे.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी मागील बैठकीत पुनर्रचित इमारतीतील गाळेधारकांना त्यांचे गाळे कायम स्वरुपी मालकी तत्वावर देऊन मंडळाची जबाबदारी कशी कमी होईल यादृष्टीने अभ्यास करण्याचे ठरले असून अशा इमारतीची माहीती उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) यांना जमा करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत असे निदर्शनास आणून त्यांनी किती ठोस माहिती गोळा केली अशी विचारणा केली.

श्री. लोहकरे, उ.मु.अभि. यांनी अशी माहिती दिली की, जून्या इमारतींचे नकाशे शोधून भूखंडाचे क्षेत्रफळ किती आहे ते शोधण्याचे काम चालू आहे. त्यांच्याकडे फक्त गाळे आणि इमारतींची यादी आहे.

यावर मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, शासनाने मंत्रीमंडळाच्या बैठकीत कालच निर्णय घेऊन पी.एम.जी.पी.च्या इमारतींच्या सोसायटयांनी स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचे शासनाने बंधन घातले आहे. त्याप्रमाणेच पुनर्रचित इमारतींच्याबाबतही स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचे बंधन घालण्याबाबत मंडळास निर्णय घ्यावा लागेल. तसा प्रस्ताव मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करण्यात यावा अशी सूचना केली.

मा. सभापती यांनी असेही निदर्शनास आणले की, मंडळाने रु. १२ कोटी खर्चून पी.एम.जी.पी.च्या सर्व इमारतींची दुरुस्ती केली होती. तरीदेखील मध्यंतरी उमरखाडी येथील एका पी.एम.जी.पी.च्या इमारतीचा स्लॅब कोसळून अपघात झाला होता. यावरुन एवढा खर्च करुनही पी.एम.जी.पी.च्या इमारतींच्या स्ट्रक्चरल दुरुस्तीचा हेतू साध्य झालेला नाही. भविष्यात असे अपघात होऊ नयेत यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहेत.

मा. मुख्य अधिकारी यांनी श्री. लोहकरे, उ.मु.अभि. यांना सूचना दिल्या की, सर्व पुनर्रचित इमारती व पी.एम.जी.पी.च्या इमारतींची माहिती गोळा करण्यात यावी व सदर काम जूलै अखेर पूर्ण करण्यात यावे.

स्ट्रक्चरल ऑडीट बाबत मा. मुख्य अधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की, बी.एम.सी. कायद्यातील तरतुदीनुसार प्रत्येक इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट ३० वर्षांनी करण्याची तरतुद प्रस्तावित असल्यामुळे ती मंडळास देखील बंधनकारक असणार आहे. जेव्हा सदर तरतुद अंमलात

येईल तेव्हा त्या तरतुदीतील सूचनांनुसार मंडळाने बांधलेल्या इमारतींच्या बाबतीत तसेच १६००० उपकरप्राप्त इमारतींच्या बाबतीत कार्यवाही करण्यात येईल.

मा. सभापती यांनी स्ट्रक्चरल ऑडीट हे करावेच लागेल परंतु जर स्ट्रक्चरल ऑडीट केले नाही तर म.न.पा. स्वतः स्ट्रक्चरल ऑडीट करेल व त्याची किमत संबंधिताकडून वसुल करेल अशी तरतुद असल्याचे नमूद करुन पी.एम.जी.पी.च्या इमारतींच्या बाबतीत रहिवाशांचा सहभाग किंवा खाजगी सोसायटींच्या माध्यमातून काही योजना आखू शकतो का यासाठी धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल असे नमूद केले. मा. सभापती यांनी कलम ३३(९) खाली क्लस्टर डेव्हलपमेंट अंतर्गत १९६९ च्या पूर्वीच्या इमारतींचा समावेश करण्यात येणार असल्याने १९६९ नंतरच्या इमारतींबाबत काय? अशी विचारणा करता श्री. लोहकरे, उ.मु.अभि. यांनी अशी माहिती दिली की, प्रस्तावित अधीसूचना अंतीम झाल्यास या सुचनेनुसार १९६९ नंतरच्या इमारतींचा शासनाची मान्यता घेऊन समावेश करणे शक्य आहे.

मा. मुख्य अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, कलम ३३(९) खाली 'क्लस्टर डेव्हलपमेंट' चा मसुदा तयार केला असून तो अद्याप अंतिम झालेला नाही. त्याचे सादरीकरण सभागृहात करण्यात येईल. त्यामध्ये काय प्रस्तावित आहे, शासनाची काय भूमिका आहे याबाबतची माहिती मिळेल. पुनर्रचित इमारतींचा पुनर्विकास कसा करावयाचा किंवा पी.एम.जी.पी.च्या इमारती रहिवाशी ताब्यात घेण्यास तयार नाहीत, त्या इमारतींची देखभाल केली जात नाही त्याबाबत काय केले पाहिजे याबाबतचा अभ्यास करुन सविस्तर प्रस्ताव तयार करुन शासनाकडे पाठविणे आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, मा. सदस्य श्री. लष्करी व मंडळाचे उपमुख्य अभियंता श्री. लोहकरे यांचे समवेत त्यांनी नुकतीच उमरखाडी विभागातील पी.एम.जी.पी.च्या इमारतींची पाहणी केली व अशी सूचना केली की, या इमारतींच्या दुरुस्तीसाठी केलेला खर्च व झालेले काम याची तपासणी करण्यात यावी तसेच त्यातील काही निधी उरला असल्यास त्या निधीमध्ये त्या इमारतींची दुरुस्ती करण्यात यावी. पी.एम.जी.पी.च्या इमारतींतील लोकांची मालकी हक्काने गाळे घेण्याची जी इच्छा पूर्वी होती ती आता नाही. त्यांना मालकी हक्काने घरे नको आहेत. याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या स्तरावर त्यांचा पत्रव्यवहार चालू आहे. या लोकांची एक संयुक्त बैठक आयोजित करुन त्या बैठकीस मा. सदस्यांना बोलवावे.

मा. सभापती यांनी अशी विचारणा केली की, ओंकार बिल्डिंगचा स्लॅब कोसळला त्या इमारतीची दुरुस्ती करण्यात येणार आहे का? यावर उपमुख्य अभियंता श्री. लोहकरे यांनी माहिती दिली की, पी.एम.जी.पी.च्या इमारतींच्या 'वनटाईम रिपेरिंग' साठी रु.१५ कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली होती. त्यापैकी रु.४ कोटी शिल्लक असून त्यामधून सदर इमारतीचे काम करण्याचे प्रस्तावित आहे. दुरुस्तीकरीता येणाऱ्या खर्चासाठी मंजूरी घेण्यात आली आहे. त्यांनी अधिक माहिती देताना सांगितले की, सन २००० पासून इतर इमारतींची दुरुस्तीची कामे सुरु करण्यात आली होती व ती तीन वर्षापूर्वी पूर्ण करण्यात आली आहेत. सदर कामे करताना प्रत्येक इमारतीसाठी स्ट्रक्चरल कन्सलटन्ट कम आर्किटेक्चर नेमला होता. त्यावेळी त्या आर्किटेक्टने

इमारतीची पाहणी करुन अंदाजपत्रक बनविले होते. त्या अंदाजपत्रकानुसार मंडळाने २००६ पर्यंत आवश्यक त्या दुरुस्त्या करुन दिल्या. परंतु २००६ नंतर रहिवाशांनी इमारतींची देखभाल न केल्यामुळे पुन्हा इमारतीची अवस्था खराब झाली असून आता त्या इमारतींची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

यावर मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, जे रु.४ कोटी उरले आहेत त्यामध्ये सर्वच इमारतींची दुरुस्ती होऊ शकणार नाही. म्हणून ज्या इमारतीं धोकादायक झाल्या आहेत त्यांची तांततडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे अशा इमारतीची प्राधान्य यादी ठरवून दुरुस्तीचे काम करावे लागणार आहे. अशा इमारतींची दुरुस्तीची अंदाजपत्रके बनवून त्यास प्रशासकीय मंजूरी घेण्यात यावी.

मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, 'वनटाईम रिपेरिंग' साठी जेवढा खर्च अपेक्षित होता तेवढया खर्चासाठी शासनाची मंजूरी घेण्यात आली व मंडळास तेवढा निधी मिळाला. या निधीतील जी रक्कम उरली आहे त्या निधीतून दुरुस्तीची कामे करावयाची की नाही हा मुद्दा निर्माण झाला आहे. याबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे. कारण उर्वरित पैशातून जर एका इमारतीची दुरुस्ती केली तर पुन्हा इतर इमारतींच्या दुरूस्तीचा प्रश्न येईल. मंडळ कितीवेळा 'वनटाईम रिपेरिंग' करणार? रहिवाशी त्यांच्या इमारती कधी ताब्यात घेणार? या मुद्दयाबाबत तपासणी करावी लागणार आहे. दुर्घटना झालेल्या ओंकार बिल्डिंगच्या स्ट्रक्चरल ऑडीटसाठी येणारा खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे व दुरुस्तीसाठी येणारा खर्च ही करण्यात येईल. उपमुख्य अभियंता यांनी त्याप्रमाणे त्वरीत कार्यवाही करावी.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी असे प्रतिपादन केले की, पी.एम.जी.पी.च्या ज्या ६६ इमारती आहेत त्या सर्वच इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन घेण्यात यावे. कारण दुर्घटना झालेली ओंकार बिल्डिंग ही १९९५ सालची असून १३ वर्षांनंतर त्या इमारतीचा स्लॅब कोसळला तर मग बाकीच्या इमारतींची काय दुर्दशा असेल? त्या कशाप्रकारे बांधण्यात आल्या आहेत? इमारती बांधताना कुठल्या दर्जाचा माल वापरला आहे? हे कळून येत नाही. म्हणूनच स्ट्रक्चरल ऑडीट करणे आवश्यक आहे.१३ वर्षाने अपघात होऊन इमारत कोसळली असल्यामुळे पी.एम.जी.पी.च्या इमारतीतील रहिवाशी भयभित झाले आहेत. त्यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, पी.एम.जी.पी.च्या इमारतीतील रहिवाशांना सुरुवातीस वाटले होते की, इमारती मालकी हक्काने ताब्यात घ्याव्यात. त्यासाठी त्यांनी काही रक्कम जमाही केली होती. परंतु आता सदर रहिवाशी त्यांच्या इमारती कोसळतील या भितीने मालकी हक्काने घेण्यास मुळीच तयार नाहीत.

यावर मा. सभापती यांनी असे सूचविले की, पी.एम.जी.पी.च्या इमारतीतील रहिवाशांची जबाबदारी मंडळावर असल्यामुळे रहिवाशांना मालकी हक्काने घरे देण्यासंदर्भात मंडळाने जबाबदारी घेऊन धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी पी.एम.जी.पी.च्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट व दुरुस्तीबाबतची माहिती घेण्याचे काम किती दिवसात पूर्ण होईल अशी विचारणा केली असता मा. सभापती यांनी सदर काम स्टाफ कमी असल्यामुळे या कामासाठी एक खाजगी यंत्रणा नेमावी तसेच सदर काम करु इच्छीणाऱ्या वास्तुशास्त्रज्ञांची नेमणूक करावी व त्यांच्या मदतीने अधिका-यांनी

मिळून हे काम करावे अशी सूचना केली. व मा. मुख्य अधिकारी यांनी सदर काम श्री.लोहकरे यांनी महिनाभरात पूर्ण करावे अशा सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी दुर्घटना झालेल्या ओंकार इमारतीतील १२ रहिवाशांना निष्कासित करण्याच्या नोटीसा मिळाल्या असून त्याबाबत सचिव, गृहनिर्माण यांना याबाबत निर्णय घेण्यासाठी विनंती केली आहे असे निदर्शनास आणले असता मा.मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, त्या १२ रहिवाशांना कुर्ला येथील संक्रमण शिबीरात गाळे वितरीत केले होते. परंतु ते तेथे जाण्यास तयार नाही. त्या रहिवाशांना पुनर्रचित इमारतीतील जागा हवी आहे. यावर श्री.लोहकरे, उ.मु.अभि.यांनी माहिती दिली की, म्हातारपाखाडी येथे मंडळाची एक इमारत पुनर्रचित झालेली असून त्या इमारतीतील २२५ चौ.फू. क्षेत्रफळाचे गाळे मिळावेत अशी त्यांची मागणी आहे. परंतु त्यांना तेथे नियमानुसार जागा देता येणार नाही असे त्यांनी रहिवाशांना सांगितले आहे.

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, सदर रहिवाशी त्यांनासुध्दा भेटले होते. त्यावेळी त्यांना असे सूचविले होते की, जे गाळे अतिशय धोकादायक आहेत असे चारच गाळे असून केवळ त्याच गाळयातील रहिवाशांना ताबडतोब हलविण्यात यावे. १२ च्या १२ गाळेधारकांना ताबडतोब हलविण्याची गरज नाही. चार रहिवाशांपैकी तिघांना प्रतिक्षा नगर संक्रमण शिबीरात व एकास तेथेच जवळ जागा देण्याबाबत श्री.बगाटे, उ.मु.अधिकारी यांनी प्रयत्न करावा अशा सूचना दिल्या.

मा.मुख्य अधिकारी यांनी श्री.लोहकरे, उ.मु.अभि.यांना सूचना दिल्या की, चार धोकादायक गाळ्यांतील रहिवाशांना तांतडीने हलविण्यात यावे व त्या इमारतीचा अहवाल सादर करावा.

मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी त्याच कॉम्प्लेक्समध्ये मंडळाच्या ताब्यातील अनिवासी गाळे बरेच वर्षे बंद असून त्या गाळयांत टेकू लावण्याची गरज असून ते गाळे उघडून त्वरित टेकू लावण्यात यावेत अशी सूचना केली. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी श्री.लोहकरे, उ.मु.अभि.यांना सूचना दिल्या की, सदर अनिवासी गाळयाची त्वरीत पहाणी करून योग्यती कार्यवाही करावी.

मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी बी.विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयाची जागा अतिशय लहान असून त्या कार्यालयासाठी तेथील मंडळाच्या एका इमारतीत गाळे रिक्त पडून आहेत त्या गाळयात सदर कार्यालयास जागा देण्यात यावी अशी सूचना केली.

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, काही वेळा ज्या जागा आपणास रिक्त दिसतात त्या रहिवाशांमधील अंतर्गत वादामुळे वा कोर्टातील प्रकरणामुळे रिक्त असतात. म्हणून सदर जागा कार्यालयासाठी देण्यापूर्वी याबाबत तपासणी करावी अशा सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. मा सभापती यांनी याच अनुषंगाने असे निदर्शनास आणले की, त्यांनी मिल कामगारांच्या संघटनांचे प्रतिनिधी या नात्याने तसेच मंडळाचे सभापती या नात्याने गिरण्याच्या जमिनीचा एक तृतीयांश भाग म्हाडास संक्रमण शिबीरासाठी मिळण्याबाबत प्रयत्न केले होते. त्यांनी घेतलेल्या या भूमिकेस सुदैवाने यश येऊन गिरण्याच्या जमिनीचा एक तृतीयांश भाग म्हाडास मिळाला आहे. या जागेवर बांधण्यात येणाऱ्या संक्रमण शिबीरांच्या इमारतींपैकी एक इमारत आपण मंडळाच्या कार्यालयासाठी वापरु शकतो व तशी मागणी मा. मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे सुध्दा त्यांनी केली असून मा.

मुख्यमंत्री महोदयांनी या मागणीस सहमती दर्शविली आहे. अशाप्रकारे, गिरणी जमिनीवरील संक्रमण शिबीरांच्या इमारतींपैकी एक इमारत आपण मंडळाच्या कार्यालयासाठी वापरल्यास मंडळाच्या कार्यालयाची व कुलाबासारख्या भागातील नागरिकांना वांद्रे ऐवजी जवळच मंडळाचे कार्यालय उपलब्ध होईल व त्यांचा वेळ वाचेल असा फायदा होणार आहे. म्हणून विभागीय कार्यालये एकाच ठिकाणी उपलब्ध होण्याबाबतचा प्रस्ताव तयार करुन मंडळासमोर आणल्यास मंडळ निर्णय घेऊन ठराव करु शकेल.

यावर उपमुख्य अभियंता (द.) श्री. सेहगल यांनी अशी माहिती दिली की, सन १९९३-९४ च्या सुमारास रजनीमहल, ताडदेव या इमारतीच्या मागे एक इमारत मंडळाच्या प्रशासकीय कार्यालयासाठी वापरण्याचा प्रस्ताव विचाराधीन होता.

मा. मुख्य अधिकारी यांनी प्रस्ताव चांगला आहे असे मत व्यक्त करुन अशी माहिती दिली की, मा.प्रधान सचिव, नगर विकास येथे गिरण्याच्या जमिनीबाबत एक बैठक होणार असून त्या बैठकीस तेही उपस्थित राहणार आहेत. स्वतंत्र प्रशासकीय इमारतीसाठी जागा उपलब्ध होऊ शकते का ? याबाबत ते माहिती घेऊन सदर विषय ते बैठकीत मांडतील

मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी ताडदेव येथील रजनी महल इमारतीतील कार्यालयात मोठया प्रमाणात गळती असल्याचे निदर्शनास आणले असता मा. मुख्य अधिकारी यांनी सदर इमारतीच्या दुरुस्तीबाबतचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना अधिका-यांना दिल्या असल्याची माहिती दिली. व अशाच प्रकारे मंडळाच्या इतरही कार्यालयांना दुरुस्तीची आवश्यकता असल्यास त्याही कार्यालयांच्या दुरुस्तीचे प्रस्ताव सादर करण्यात यावेत अशा अधिका-यांना सूचना दिल्या.

मा. सभापती यांनी केवळ कार्यालयाची दुरुस्ती न करता कार्यालयात चांगले फर्निचरसुध्दा उपलब्ध करुन द्यावे अशी सूचना केली.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी अे.आर.पी इमारतीत ज्या ३३ भाडेकरुना संक्रमण शिबीर म्हणून गाळे दिलेले आहेत त्या इमारतीची अवस्था अत्यंत खराब असल्यामुळे त्यांना मे २००८ पर्यंत हलविण्याची कार्यवाही करण्याचे ठरले होते. त्याबाबत काय झाले अशी विचारणा केली. यावर श्री.लोहकरे, उ.मु.अभि.यांनी माहिती दिली की, इमारतीस विद्युत पुरवठा झालेला नसून आता इलेक्ट्रिक सबस्टेशन बांधण्याचे काम सुरु झाले आहे. त्यामुळे या गाळेधारकांना गाळे देण्यासाठी तयार नाहीत.

मा. मुख्य अधिकारी यांनी इमारत अतिशय धोकादायक असून केव्हाही पडू शकते म्हणून श्री.लोहकरे,उ.मु.अभि.यांनी सदर इमारतीस लाईट मिळण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी व त्यामध्ये काही अडचण असल्यास त्याबाबत मा.मुख्य अधिकारी यांची मदत घ्यावी परंतु कोणत्याही परिस्थितीत जूलै महिन्याच्या अखेरीस इमारतीची सर्व कामे पूर्ण होऊन रहिवाशी त्या इमारतीत रहावयास जातील असे पाहावे.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, मागील बैठकीत उपमुख्य अधिकारी (सं.गा) यांनी धोकादायक इमारतीतील रहिवाशांसाठी १५०० संक्रमण गाळे उपलब्ध असल्याचे सांगितले होते. परंतु प्रत्यक्षात असे अनुभवास मिळाले की, धोकादायक इमारतीतील

रहिवाशांना विभागीय कार्यालयाकडून उपलब्ध संक्रमण गाळयांची यादी देण्यात आली. त्याप्रमाणे रहिवाशी संक्रमण गाळे घेण्यासाठी ३ ते ४ वेळा गेले परंतु प्रत्यक्षात त्यांना ते गाळे मिळाले नाहीत. अखेरीस ते रहिवाशी कंटाळून गेले व नाईलाजाने आजपर्यंत ते धोकादायक इमारतीतच रहात आहेत. जर १५०० संक्रमण गाळे उपलब्ध होते तर ही अडचण का यावी? अशी त्यांनी विचारणा केली.

यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, गेल्याच आठवडयात संक्रमण शिबीरांतील समस्यांबाबत व वर्तमानपत्रातून मंडळाच्या होत असलेल्या बदनामीबाबत मा. सदस्य व अधिकारी यांची बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीत १२०० संक्रमण गाळे उपलब्ध होते असे सांगण्यात आले असले तरी ते खरोखर रिक्त आहेत की नाहीत याची प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली नव्हती. तसेच रेकॉर्डप्रमाणे गाळा रिक्त असला तरी आधीच कोणीतरी गाळयात रहात होते असेही दिसून आले होते. तसेच काही गाळे जे वाटप केले ते अस्तित्वातच नव्हते अशाही घटना घडल्या आहेत. त्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली होती असे सांगून मा. सभापती यांनी श्री.बगाटे, उपमुख्य अधिकारी यांना माहिती देण्याच्या सूचना दिल्या.

श्री.बगाटे, उपमुख्य अधिकारी (सं.गा.) यांनी माहिती दिली की, जेव्हा सर्वे करण्यात आला तेव्हा १५०० संक्रमण गाळे उपलब्ध होते. एखादा संक्रमण गाळा रिक्त झाल्यानंतर त्या गाळयाचे संरक्षण करण्यासाठी मंडळाकडे यंत्रणा उपलब्ध नाही. त्यामुळे त्या गाळयात घुसखोरी होते. तसेच विकासकांकडून मंडळाचे संक्रमण गाळे खाली करुन मंडळाच्या ताब्यात घेण्यात येत आहेत. तसेच ज्या लोकांना गाळे मिळाले नाहीत त्यांना नोटीसीद्वारे आवाहन करण्यात येत आहे की, संक्रमण गाळे मिळण्यासाठी त्यांनी मंडळाच्या भाडेवसुलीकारांशी संपर्क साधावा. अशाप्रकारे संक्रमण गाळयांचे वाटपासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, जो संक्रमण गाळा वितरीत करण्यात येतो त्या गाळयात घुसखोर राहाताना आढळतात. व काही गाळे एवढे खराब असतात की ते राहण्यालायक नसतात.अशाप्रकारे रहिवाशांची व मा.सदस्यांची फसवणुक करण्यात येत आहे. मा.सदस्य लोकप्रतिनिधी असल्यामुळे त्यांना या गोष्टींना सामोर जावे लागते. व लोकांची कामे होत नसल्याबद्दल वरिष्ठ पक्षनेत्यांकडूनही त्यांना जाब विचारण्यात येतो. त्यांनी असेही निदर्शनास आणले की, दोन तीन बैठकांपूर्वी त्यांनी विचारणा केली होती की, विकासकांच्या ताब्यात किती संक्रमण गाळे आहेत? ज्या विकासकांच्या इमारती तयार झाल्या आहेत त्यांच्याकडून संक्रमण गाळे मंडळाने घ्यावयास पाहिजे होते. तो विकासक दुस-या मालमत्तेवरील रहिवाशाला तो गाळा देतो.मुदत संपल्यानंतरही ५-६ वर्षे तो विकासक गाळे वापरत असतो. म्हणून याची तपासणी करुन अशा विकासकांना नोटीस देऊन गाळे ताब्यात घेतले पाहिजे. मंडळाच्या रहिवाशांना संक्रमण गाळे देण्याची गरज असताना विकासकांना संक्रमण गाळे देण्यात येऊ नयेत.

यावर श्री.बगाटे, उपमुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, दोन विकासकांविरुध्द पोलीसात तक्रार दाखल करण्यात आली आहे. उर्वरित विकासकांविरुध्द पोलीसात तक्रार दाखल करण्याची कारवाई करण्यात येत आहे. परंतु पोलीस तक्रार दाखल करुन घेत नाहीत वा दाखल करुन घेताना काही कायदेशीर मुद्दे उपस्थित करतात. याबाबतीत मा.मुख्य अधिकारी यांच्या

स्तरावर पोलीस विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून कार्यवाही करण्यात येत आहे. त्यांनी पुढे अशीही माहिती दिली की, एप्रिल-मे मध्ये जेव्हा त्यांनी घुसखोरांना काढून टाकण्याच्या कारवाईस सुरुवात केली तेव्हा हे घुसखोर कसे ठरवावयाचे असा प्रश्न निर्माण होऊन निष्कासन कारवाई न करण्याबाबत तोंडी आदेश मिळाल्यामुळे कारवाई स्थगित आहे. तरीसुध्दा ज्या विकासकांची मुदत संपलेली आहे त्या विकासकांकडून मा. मुख्य अधिकारी यांच्या आदेशानुसार गाळे मंडळाच्या ताब्यात घेण्याचे काम चालू आहे.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी किती भाडेकरुंना संक्रमण गाळे दिले? किती धोकादायक इमारती खाली केल्या? याची माहिती देण्यात यावी अशी सूचना केली. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी ७९ इमारतींच्या बाबतीत जी कार्यवाही करण्यात आली त्याबाबत माहिती उपमुख्य अभियंता (दक्षिण) व उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी द्यावी अशी सूचना केली.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी अशी सूचना केली की, ज्या नवीन भाडेवसुलीकारांना नियुक्त करण्यात येईल त्यांना मंडळाच्या संक्रमण शिबीरात राहण्यास जागा दिल्यास ते भाडेवसुलीकार संक्रमण गाळयांकडे लक्ष देतील. त्यामुळे घुसखोरीस आळा बसेल व भाडेवसुलीही तो व्यवस्थित करु शकेल.

यावर श्री.बगाटे, उपमुख्य अधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की, मा. सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे त्यांनी प्रत्येक भाडेवसुलीकाराला त्यांना सोयीस्कर असलेल्या संक्रमण शिबीराबाबत विचारणा केली व प्रस्ताव तयार करुन सहमुख्य अधिकारी यांच्याकडे सहीकरिता पाठविला आहे. मा. मुख्य अधिकारी यांनीही सदर प्रस्तावास सहमती दर्शविली आहे.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी मंडळाचे कंट्रोल रुम सुसज्ज व सुव्यवस्थित असावे अशी सूचना केली होती असे निदर्शनास आणले असता श्री. सेहगल, उमुख्य अभियंता यांनी कंट्रोल रुममध्ये आवश्यक त्या सर्व सुविधा व साधने असून केवळ वाहने बरोबर नाहीत. वाहने बरोबर नसली तरी अधिकारी टॅक्सीने प्रवास करु शकतात व ते सी.ओ.पी.व्दारे प्रवास भत्ता घेऊ शकतात. त्यांनी अशीही माहिती दिली की, कंट्रोल रुमचे रिनोव्हेशनचे काम लवकर करण्यात येणार असून पूर्वीपेक्षाही चांगल्याप्रकारचे कंट्रोल रुम तयार होणार आहे. त्यामध्ये रिक्रेएशन रुम, मिटिंग रुम असेल. सदर काम ३ ते ४ महिन्यात पूर्ण होईल.

मा. सभापती यांनी नवीन वाहने मिळण्याबाबतचा प्रस्ताव सादर करावा अशी सूचना केली असता मा. मुख्य अधिकारी यांनी नवीन मंडळासाठी वाहने खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणास सादर केला असून सदर प्रस्ताव मंजूर झाला असून नवीन वाहन मिळेपर्यंत भाडयाने वाहने घेण्यासाठी परवानगी मागितली आहे.

उपमुख्य अभियंता (उत्तर) श्री. त्रिवेदी व उपमुख्य अभियंता (दक्षिण) श्री. सेहगल यांनी असे निदर्शनास आणले की, मंडळाच्या अभियंत्यांना त्यांचा स्वतःचा भ्रमण दूरध्वनी वापरावा लागतो. त्यांना भ्रमण दूरध्वनीच्या देयकाचे पैसे मिळत नाहीत. तरी दरमहिना कार्यकारी अभियंता यांना किमान रु.१०००/- देण्यात यावेत व उप अभियंता यांना किमान रु.५००/- देण्यात यावेत. यावर मा. सभापती यांनी सदर सूचना योग्य असून अधिकाऱ्यांना भ्रमण दूरध्वनीच्या देयकाचे पैसे

मिळणबाबतचा प्रस्ताव मुख्य लेखाधिकारी यांनी सादर करावा अशी सूचना केली. मा. मुख्य अधिकारी यांनी सदर प्रस्ताव सादर केला नसल्यास तो त्वरित सादर करावा अशा सूचना लेखा विभागाच्या अधिका-यांना दिल्या.

मा.सदस्य श्री. तारीक फारुकी यांनी संक्रमण शिबीराच्या सर्वेनुसार संक्रमण शिबीरात किती गाळे रिक्त आहेत, किती गाळयांत घुसखोर आहेत याची माहिती सर्व मा.सदस्यांना देण्यात येणार होती ती अद्याप देण्यात आलेली नाही असे निदर्शनास आणले असता मा. मुख्य अधिकारी यांनी श्री. बगाटे, उ.मु.अधिकारी यांना सदर माहिती मा.सदस्यांना देण्याच्या सूचना दिल्या व मा. सभापती यांनी मा. सदस्यांना विनंती केली की, मा. सदस्यांनी सदर माहिती गोपनीय असल्यामुळे ती गोपनीय ठेवावी.

मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी कलम ३३ (९) अंतर्गत करावयाच्या पुनर्बांधणीबाबत शासनाने सूचना मागविल्या आहेत. तरी सर्व सदस्यांना ३३ (९) च्या प्रस्तावाची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी अशी सूचना केली. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी ३३ (९) च्या प्रस्तावाचे सादरीकरण करण्यात येईल व माहितीची प्रतही देण्यात येईल असे सांगितले.

**बाब क्रमांक १०९.२** (दक्षिण परीमंडळ)

विषय- अ) दक्षिण परीमंडळातील ५० उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव व खालील ५ इमारतींच्या मंजुर प्रशासकिय मान्यतेपेक्षा जास्तीच्या खर्चास मंजुरीबाबत.

ब) इमारत क्रमांक १६१ जे.एस.एस रोड च्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत.

क) इमारत क्रमांक ९अे/२७बी/ २७सी सिरी रोड या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत प्रशासकिय मान्यतेच्या जास्त खर्चाची मंजुरी मिळण्याबाबत.

ड) १३४-१३८ ऑगस्ट क्रांती मार्ग या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत.

इ) इमारत क्रमांक २०५, बोरा बाजार स्ट्रीट च्या दुरुस्तीबाबत. प्रशासकिय मान्यतेस नुतनीकरण करण्याबाबत.

ई) इमारत क्रमांक ५ वॉल्टन रोड ऐवजी इमारत क्र.६ वॉल्टन रोड असे संबोधण्याबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. ११ ते ३९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सचिव यांनी सभागृहास माहिती दिली की, यापैकी काही प्रस्ताव मंजूरीसाठी सादर करण्यात आले. दक्षिण परीमंडळातील 'अ' प्रमाणे ५० उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना तसेच 'ब' मधील प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु. ६,१८,८५,१८०/- व निव्वळ रक्कम रु.३,४०,०९,२२८/- देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक १०९ /८९९**

दक्षिण परीमंडळातील खालील एकुण ५० उपकरप्राप्त इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांचे मुळ/ सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

अ) दक्षिण परीमंडळातील ५० उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव व खालील ५ इमारतींच्या मंजुर प्रशासकिय मान्यतेपेक्षा जास्तीच्या खर्चास मंजुरीबाबत.

ब) इमारत क्रमांक १६१ जे.एस.एस रोड च्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत.

क) इमारत क्रमांक ९अे/२७बी/ २७सी सिरी रोड या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत प्रशासकिय मान्यतेच्या जास्त खर्चाची मंजुरी मिळण्याबाबत.

ड ) १३४-१३८ ऑगस्ट क्रांती मार्ग या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत.

इ) इमारत क्रमांक २०५, बोरा बाजार स्ट्रीट च्या दुरुस्तीबाबत. प्रशासकिय मान्यतेस नुतनीकरण करण्याबाबत.

ई) इमारत क्रमांक ५ वॉल्टन रोड ऐवजी इमारत क्र.६ वॉल्टन रोड असे संबोधण्याबाबत.

--------------------xox--------------------

**बाब क्रमांक १०९.३ ( पुनर्रचना विभाग )**

विषय- १४ ते ३२ कामाठीपूरा, ८वी गल्ली ई विभाग भुकर पाहाणी क्र.५७२ ते ५७८ भायखळा विभाग

--------------------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. ३७ ते ३९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.उपरोक्त प्रस्तावाबाबत उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) यांनी योजनेची माहिती सर्व सदस्यांना दिली. सदर विषयांवर चर्चा होऊन इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक १०९ /९००**

इमारत क्र. १४ ते ३२ कामाठीपूरा, ८वी गल्ली ई विभाग भुकर पाहाणी क्र.५७२ ते ५७८ भायखळा विभाग या इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेस रु.१,३६,३३, ९१५/- इतक्या रक्कमेस मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

बाब क्रमांक १०९.४
(उपमुख्य अभियंता / संक्रमण शिबीर)

विषय- कफ परेड कुलाबा येथील संक्रमण शिबिराचा पुनर्विकास.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. ४१ ते ४३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावावर विस्तृत चर्चा होऊन मा.सभापती यांनी पुढे असे मत मांडले की, कुलाबा संक्रमण शिबीरात मंडळाचे मुळ गाळेधारक किती आहेत हे पाहणे आवश्यक आहे. त्यांच्या मते कुलाबा संक्रमण शिबीरात ५०% लोक घुसखोर व ५०% लोक मुळ गाळेधारक आहेत. जर ६०० लोक कुलाबा संक्रमण शिबीरात असतील तर त्यापैकी ३०० घुसखोर व ३०० मुळ गाळेधारक असतील. जर मंडळाने कुलाबा परिसरात पुनर्रचित इमारती बांधल्या तर या मुळ ३०० गाळेधारकांपैकी १०० ते १५० लोकांची राहण्याची सोय तेथेच होऊ शकते. व उर्वरित मुळ गाळेधारकांना मंडळातर्फे/शासनातर्फे कुलाबा भागाचा पुनर्विकास करण्यात येत आहे त्यामध्ये समाविष्ट करु शकतो. तसेच तेथील संक्रमण शिबीरांची पुनर्बांधणी करण्यात येणार असल्यामुळे संक्रमण शिबीर उपलब्ध होईल तसेच घुसखोरांना काढून टाकल्यानंतर घुसखोरही राहणार नाहीत अशाप्रकारची मंडळाची भूमिका असली पाहिजे.

यावर मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी अशी सूचना केली की, मालकी हक्काने संक्रमण गाळे देण्याबाबत रहिवाशांच्या मागणीबाबत कायदेशीर बाजू मांडताना मा. सभापती यांनी मांडलेल्या मुद्दयांचाही प्रस्तावात समावेश करण्यात यावा. म्हणजे मा.सदस्यही शासनाकडे पाठपुरावा करुन शासनास सारासार विचार करुन निर्णय घेण्यास सांगतील.

मा. मुख्य अधिकारी शासनाकडे सादर करण्यात येणाऱ्या प्रस्तावात मा. सभापती महोदयांनी निदर्शनास आणलेल्या ओशिवरा व प्रतिक्षा नगर येथील संक्रमण शिबीराच्या इमारती मालकी हक्काने दिल्याची माहिती व लोकप्रतिनिधींनी जे लोकांना आश्वासन दिले आहे त्याचा तपशील त्यांच्याकडे उपलब्ध करुन दिल्यास त्याचाही उल्लेख प्रस्तावात करण्यात येईल. सर्व वस्तुस्थिती प्रस्तावात नमूद करुन प्रस्ताव पाठविण्यात येईल असे सांगीतले.

श्री.लोहकरे, उ.मु.अभि.यांनी अशी माहिती दिली की, मंडळाच्या ज्या भूखंडावर बांधकाम करता येणार नाही त्या भूखंडांचे भूसंपादन न केल्यामुळे एफ.एस.आय. मिळणार नाही असे पत्र नगर विकास विभागाकडून प्राप्त झाले आहे. यावर मा. सभापती यांनी सदर भूखंडांचे भूसंपादन करण्यात आले नाही ही मंडळाकडून चूक झालेली आहे. त्या भूखंडांवरील रहिवाशांची जबाबदारी मंडळावर आहे. त्यामुळे भूसंपादन कार्यवाही करणे आवश्यक होते.

मा. मुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, २६९ भूखंडांवरील ज्या इमारती पडल्या व पुन्हा बांधता येत नाहीत त्या इमारतीतील रहिवाशांची जबाबदारी मंडळाने स्विकारुन त्यांना संक्रमण शिबीरात स्थलांतरित केले. त्यामुळे सदर भूखंड घरमालकांच्या ताब्यात आहेत असा अर्थ होतो. सदर भूखंडांचा एफ.एस.आय.मिळवून त्या एफ.एस.आय.मध्ये दुसरीकडे पुनर्रचित इमारती

बांधणे हा जरी पर्याय असला तरी जोपर्यंत मंडळ भूसंपादन कार्यवाही करत नाही तोपर्यंत संबंधित घरमालक सुध्दा त्या जागेचा एफ.एस.आय.मागू शकतो. म्हणून प्रथम भूसंपादन कार्यवाही करणे गरजेचे आहे. भूसंपादन कार्यवाही केल्यानंतर मंडळाला एफ.एस.आय. मिळेल का? तसेच इतर कायदेशीर बाबींचा अभ्यास करुन पुढील कार्यवाही करावी लागेल.

मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी भूसंपादन अधिकारी मंडळाच्या आस्थापनेवर आहे का ? अशी विचारणा केली असता मा. मुख्य अधिकारी यांनी भूसंपादन अधिकारी हे मंजूर पद रिक्त असून ते भरण्याबाबत शासनास कळविण्यात आले आहे अशी माहिती दिली.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी विचारणा करता मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, संक्रमण शिबीरांच्या सुरक्षिततेकरिता सुरक्षा यंत्रणा नेमण्यासाठी निविदेचा नमुना बनविण्यात येत आहे. दलालांच्या विरोधात ज्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत त्याबाबत पोलीस आयुक्तांना पत्र लिहिले आहे. त्याची प्रत दक्षता अधिकारी/प्राधिकरण यांना पाठविली आहे. कायमस्वरुपी पोलीस पथक मंडळास मिळण्यासाठी शासनास पत्र लिहून मागणी करण्यात आली आहे. घुसखोरांना काढण्यासाठी जी स्थगिती देण्यात आली आहे ती उठविण्यासाठी शासनास पत्र लिहिण्यात आले आहे. ७५ संक्रमण गाळे मागील १५ दिवसांत ताब्यात घेण्यात आले आहेत.

मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी आपात्कालिन परिस्थितीत संक्रमण गाळे द्यावयाचे झाल्यास मंडळाकडे संक्रमण गाळे उपलब्ध आहेत का? अशी विचारणा केली असता मा. मुख्य अधिकारी यांनी आपात्कालिन परिस्थितीत वाटपासाठी संक्रमण गाळे उपलब्ध आहेत असे सांगितले.

<u>बाब क्रमांक १०९.५</u>

विषय- <u>म्हाडा अधि १९७६ कलम ८८ (३) अ चे प्रमाणपत्र देण्याचे प्रस्ताव.</u>

१) इमारत क्र.७१ बी माहीम बझार क्रॉस रोड माहीम
२) इमारत क्र.५४७-बी लक्ष्मी भवन एन.एम तोशी मार्ग भायखळा
३) इमारत क्र.५४७-५४९ लक्ष्मी भवन एन.एम जोशी माग
४) इमारत क्र.१९१-डी, १९३ डी माहीम विभाग
५) इमारत क्र.६७६-६७६सी कोडूसकर भवन एन.एम जोशी मार्ग
६) इमारत क्र.१४१-१४१अे विसावा भवानी शंकर रोड दादर
७) इमारत क्र.६४ एस, मंत्री निवास परळकर मुंबई
८) इमारत क्र.२९-एच, खोताची वाडी
९) इमारत क्र.१० रामभाऊ वऱ्हाडी चाळ परेल बॅक रोड
१०) सी.एस.क्र.५४८ माटुंगा विभाग इ.क्र.७-७डी-अे वत्सराज लेन
११) इमारत क्र.१ सुरज भवन प्लॉट नं १२१ स्किम नं६ रोड नं ३
१२) इमारत क्र.३० मोटलीबाई स्ट्रीट आगरीपाडा मुंबई

---

उपरोक्त १२ इमारतींना म्हाड अधिनियम १९७६ कलम ८८ (३) (अ) चे प्रमाणपत्र देण्याचे प्रस्ताव सादर करण्यात आले.सदर प्रस्तावांची माहिती सचिव यांनी सभागृहास दिली.

सविस्तर चर्चेअंती म्हाड अधिनियम १९७६ कलम ८८ (३) (अ) चे प्रमाणपत्र देण्याचे उपरोक्त १२ प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

**ठराव क्रमांक : १०९ / ९०१**

म्हाड अधिनियम १९७६ कलम ८८(३)(अ) चे प्रमाणपत्र देण्याच्या खाली दर्शविलेल्या १२ प्रस्तावांना एकमताने मंजूरी देण्याचे ठरले. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास एकमताने मंजूरी देण्यात आली.

१) इमारत क्र.७१ बी माहीम बझार क्रॉस रोड माहीम
२) इमारत क्र.५४७-बी लक्ष्मी भवन एन.एम तोशी मार्ग भायखळा
३) इमारत क्र.५४७-५४९ लक्ष्मी भवन एन.एम जोशी माग
४) इमारत क्र.१९१-डी, १९३ डी माहीम विभाग
५) इमारत क्र.६७६-६७६सी कोडूसकर भवन एन.एम जोशी मार्ग
६) इमारत क्र.१४१-१४१अे विसावा भवानी शंकर रोड दादर
७) इमारत क्र.६४ एस, मंत्री निवास परळकर मुंबई
८) इमारत क्र.२९-एच, खोताची वाडी
९) इमारत क्र.१० रामभाऊ वऱ्हाडी चाळ परेल बॅक रोड
१०) सी.एस.क्र.५४८ माटुंगा विभाग इ.क्र.७-७डी-अे वत्सराज लेन
११) इमारत क्र.१ सुरज भवन प्लॉट नं १२१ स्किम नं६ रोड नं ३
१२) इमारत क्र.३० मोटलीबाई स्ट्रीट आगरीपाडा मुंबई

------------oo------------

**बाब टिप्पणी क्र.१०९.६**

विषय- मुंबई बेटावरील 'अ' वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरिता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव..

---

१) भुकर पाहाणी क्र.२४१ परेल विभाग हाजी गनी चाळ
२) भुकर पाहाणी क्र.२८७ गिरगांव देसाई बिल्डींग
३) भुकर पाहाणी क्र.४७१ /१० माटुंगा विभाग मगन विहार

सचिव यांनी उपरोक्त ३ पुनर्विकासाचे विकास नियंत्रण नियमावली ३३(७)च्या प्रस्तावांबद्दल मंडळाच्या सदस्यांना थोडक्यात माहिती दिली.

**ठराव क्रमांक : १०९/९०२**

मुंबई बेटावरील खालील ३ मालमत्तांवरील 'अ' वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी प्रस्तावात नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

१) भुकर पाहाणी क्र.२४१ परेल विभाग हाजी गनी चाळ

२) भुकर पाहाणी क्र.२८७ गिरगांव देसाई बिल्डींग

३) भुकर पाहाणी क्र.४७१ /१० माटुंगा विभाग मगन विहार

**<u>बाब टिप्पणी क्र.१०९.७</u>**

**सहकार संस्था कक्ष**

विषय- नर्मदा निवास स्ट्रिट नं३० परमार गुरुजी मार्ग भुसंपादनाबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. ११३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावावर चर्चा करताना मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, माटुंगा येथील मेहता बिल्डिंगच्या रहिवाशांनी १०० पट भाडे भरुन त्यांचा प्रस्ताव मंडळाकडे सादर केला असता सहकार कक्षाच्या संबंधित अधिका-यांनी म.न.पा.ला सदर इमारत डिसेस करण्यास कळविले. त्यामुळे म.न.पा. ने ती इमारत डिसेस केल्यामुळे रहिवाशी म.न.पा.कडे पैसे भरु शकले नाहीत. मध्यंतरी मालकवर्ग सुप्रीम कोर्टात गेल्यामुळे सदर प्रकरण अडकून पडले. आता ती इमारत अतिशय धोकादायक अवस्थेत आहे. त्या इमारतीस वाली कोणीच नाही. रहिवाशांनी जायचे कोणाकडे ?

यावर श्री. त्रिवेदी, उपमुख्य अभियंता यांनी असा खुलासा केला की, मेहता इमारतीचे भूसंपादन कलम १०३ (ब) खाली करण्यात आले आहे परंतु सुप्रीम कोर्टाची स्थगिती असल्यामुळे पुढील कार्यवाही करता आलेली नाही. इमारतीचा ताबा दिलेला नाही.आता सदर इमारत शासनास व्हेस्टेड प्रॉपर्टी आहे. सदर इमारतीचे भूसंपादन झालेले असल्यामुळे त्या इमारतीची दुरुस्ती करता येत नाही. यावर मार्ग काढणे शक्य आहे. शासन निर्णयानुसार अशा इमारतींचे वेगळे अकाऊंट ठेऊन दुरुस्ती करता येऊ शकते. त्यानुसार सदर इमारतीच्या दुरुस्तीकरिता वास्तुशास्त्रज्ञ नेमून दुरुस्तीचा प्रस्ताव सादर करण्यास सांगितले आहे परंतु अद्याप प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. अद्याप महानगरपालिकेने सदर इमारत डिसेस केलेली नाही.

मा.मुख्य अधिकारी यांनी अशाच लक्ष्मी सदन नावाच्या इमारतीत त्यांनी निर्णय घेतला असून हया दोन्ही इमारतींच्या बाबतीत निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव त्यांच्याकडे सादर करण्यात यावेत अशा सूचना उममुख्य अभियंता यांना दिल्या.

**<u>ठराव क्रमांक : १०९/९०३</u>**

विषय- नर्मदा निवास स्ट्रिट नं३० परमार गुरुजी मार्ग भुसंपादनाबाबत.

---

नर्मदा निवास स्ट्रिट नं३० परमार गुरुजी मार्ग या इमारतीचे म्हाड अधिनियम कलम १०३(ब) खाली भुसंपादनाच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली व सदर प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी सादर करावा असे ठरले.

**बाब टिप्पणी क्र.१०९.८**

## मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी ठेवावयाचे विषय

म्हाडा अधिनियम १९७६ कलम ८८(३)(अ) प्रमाणपत्र देण्याचे प्रस्ताव

१. इमारत क्रमांक २२-२४ जेल रोड

२. इमारत क्रमांक ५१९ ए मोतीबाग, आर.पी.मसानी रोड, पारशी कॉलनी माटुंगा.

३. प्लॉट क्र.३९७ पटेल हाऊस माटुंगा.

४. इमारत क्र.५, चुनाम लेन सोपारीवाला हाऊस

५. इमारत क्र.४-६ फोर्जेट हिल रोड, संजना बिल्डींग.

उपरोक्त ५ इमारतींना म्हाड अधिनियम १९७६ कलम ८८ (३) (अ) चे प्रमाणपत्र देण्याचे प्रस्ताव सादर करण्यात आले.सदर प्रस्तावांची माहिती सचिव यांनी सभागृहास दिली.

**ठराव क्र.१०९/ ९०४**

म्हाडा अधिनियम १९७६ कलम ८८(३)(अ) प्रमाणपत्र देण्याचे प्रस्ताव

१. इमारत क्रमांक २२-२४ जेल रोड

२. इमारत क्रमांक ५१९ ए मोतीबाग, आर.पी.मसानी रोड, पारशी कॉलनी माटुंगा.

३. प्लॉट क्र.३९७ पटेल हाऊस माटुंगा.

४. इमारत क्र.५, चुनाम लेन सोपारीवाला हाऊस

५. इमारत क्र.४-६ फोर्जेट हिल रोड, संजना बिल्डींग.

सविस्तर चर्चेअंती म्हाड अधिनियम १९७६ कलम ८८ (३) (अ) चे प्रमाणपत्र देण्याचे उपरोक्त ५ प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

---------------------------o-------------------------

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, मंडळाच्या संक्रमण गाळयांसाठी वेगवेगळया संस्थांकडून मागणी होत असून मा.खासदास एकनाथराव गायकवाड यांच्याकडून तसेच आझमी चॅरिटेबल ट्रस्ट, एकलव्य शिक्षण साधना, सुनिता शिक्षण प्रसारक, महात्मा ज्योतिबा फुले, डोअर स्टेप कुलाबा या संस्थांकडून मागणी करण्यात आली आहे. आझमी चॅरिटेबल ट्रस्टच्या बाबतीत न्यायालयाने सदर संस्थेस गाळे देण्याबाबत मंडळाने आपल्या स्तरावर निर्णय घ्यावा असे म्हटले आहे.

मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी असे मत मांडले की, सदर संस्थांना संक्रमण गाळे रितसर मिळण्याबाबत सदर संस्थांनी मागणी केली आहे परंतु त्याप्रमाणे गाळे दिले जात नाहीत. अधिका-यांनी माहिती दिल्याप्रमाणे नियमाप्रमाणे गाळे देण्यात येत नसतील तर आतापर्यंत गाळे कसे दिले त्याचा तपशिल द्यावा.

मा. सभापती यांनी अशी सूचना केली की, मंडळाने २५ वर्षांपूर्वी जी संक्रमण शिबीरे बांधलेली आहेत त्या संक्रमण शिबीरात मुलभूत सुविधा उदा. शाळा, रेशनिंग दुकान इ. पुरविण्यात आलेले नाही. म्हणून यापुढे जी नवीन संक्रमण शिबीरे बांधण्यात येतील तेथे मुलभूत सुविधा देण्यात याव्यात. आता एस.आर.डी.तर्फे संक्रमण शिबीराचा पुनर्विकास करण्यात येत आहे. पुढील

बैठकीत एस.आर.डी. च्या अधिका-यांनाही बोलाविण्यात यावे. मा. सभापती यांनी अशीही सूचना केली की, श्री. पाटील, उपमुख्य अभियंता यांनी आझमी चॅरिटेबल ट्रस्टचे प्रकरण न्यायालयात असल्यामुळे त्याबाबतची माहिती मा. मुख्य अधिकारी यांना द्यावी मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, स्थानिक लोकांना या संस्थांचा लाभ होत असल्यामुळे निकष ठरवून सदर संस्थांना गाळे देण्याबाबत विचार करण्यासाठी प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करण्यात यावा.

मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी मुंबई मंडळाच्या सदस्यांना देण्यात आलेली ओळखपत्रे ही दु.व पु.मंडळाच्या सदस्यांना देण्यात आलेल्या ओळखपत्रांपेक्षा चांगली आहेत असे निदर्शनास आणून त्यांनाही चांगली ओळखपत्रे देण्यात यावीत अशी सूचना केली असता मा. मुख्य अधिकारी यांनी मा. सदस्यांना त्यांच्या पसंतीचे ओळखपत्र देण्याबाबत सचिव यांना सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री. नंदकुमार काळे यांनी त्यांना देण्यात आलेल्या संक्रमण शिबीराच्या महितीमध्ये दोन इमारती वगळण्यात आल्या आहेत तरीही एकूण इमारतींची संख्या व गाळयांची संख्या बरोबर दाखविण्यात आली आहे तसेच घुसखोर किती, मुळ गाळेधारक किती ही माहिती कळून येत नाही असे निदर्शनास आणून अशाप्रकारे माहिती घाईघाईने सादर केली असल्यास पुन्हा सदर माहिती तपासून सादर करण्यात यावी अशी सूचना केली.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, चिखलवाडी येथील रहिवाशांकडून भाडे गोळा करण्यात येत नसल्याबाबत त्यांनी मागील एका बैठकीत तक्रार केली होती. त्यानंतर मंडळाच्या काही भाडेवसुलीकारांना नेमण्यात आले होते. एक आठवडाभर त्या भाडेवसुलीकारांनी काम केले व नंतर तेथे जाण्याचे बंद केले. त्यामुळे पुन्हा रहिवाशांचे भाडे थकलेले आहे. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, मंडळाकडे भाडेवसुलीकार उपलब्ध नव्हते व आता भाडेवसुलीकारांची पदे भरण्यात आली असून केवळ २२ पदे रिक्त आहेत त्यामुळे चिखलवाडी येथे लवकरच कायम स्वरुपी भाडेवसुलीकार नेमण्यात येईल.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी अशी सूचना केली की, दुरुस्तीसाठी अधिकची रक्कम भरण्याकरिता रहिवाशांना मंडळाच्या एका कार्यालयातून दुस-या कार्यालयात पाठविण्यात येते. असे न करता त्या त्या विभागीय कार्यालयात पैसे भरण्याची व्यवस्था करण्यात यावी. श्री.सेहगल, उ.मु.अभियंता यांनी यावर अधिकची रक्कम त्या त्या विभागीय कार्यालयाच्या लेखा अधिकारी शाखेत घेतली जाते. तरीदेखील त्यांच्या विभागीय कार्यालयात कार्यकारी अभियंता यांच्याकडे अधिकची रक्कम चेक किंवा डी.डी.व्दारे भरल्यास संबंधित लेखा विभागास ती रक्कम पाठविण्याची ते व्यवस्था करतील असे आश्वासन दिले.

मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी ओंकार इमारतीच्या रहिवाशांनी त्यांना फोन करुन पोलीस विभागाने त्या इमारतीसाठी म्हाडावर कलम ३०४ गुन्हा दाखल केला आहे असे कळविले आहे तरी याबाबत खुलासा व्हावा अशी सूचना केली. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, याबाबत डी.सी.पी. यांच्याशी त्यांनी संपर्क साधला असून त्यांना सर्व वस्तुस्थितीची माहिती दिली आहे. मा. मुख्य अधिकारी यांनी संबंधित कार्यकारी अभियंता श्री. जैस्वाल यांना पोलीस विभागाशी संपर्क साधण्याच्या सूचना दिल्या.

अनुपालन अहवाल

विषय- बैठक क्र.१०३ ते १०७ चा अनुपालन अहवाल

सचिव यांनी मागील बैठक क्र.१०३ ते १०७ मध्ये मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती संबंधित कार्यालयांनी सादर केली आहे असे निदर्शनास आणून ती सर्व सदस्यांना वाचून दाखविली तसेच सदर अनुपालन अहवालाच्या छायांकित प्रती मा.सदस्यांच्या माहितीसाठी वाटण्यात आल्या. त्यानंतर अनुपालन अहवालावर सवीस्तर चर्चा झाली. चर्चेअंती खालीलबाबतीत माहीती घेऊन मंडळास कळविण्यात यावे असे ठरले.

१) म.न.पा जो प्रॉपर्टी टॅक्स गोळा करते त्यामध्ये विम्याची रक्कम ही अंतभूर्त असते याबाबत म.न.पा अधिका-यांनी माहिती घेऊन पुढील बैठकीत माहिती द्यावी.

२) ३३ (९) खालील इमारतींना असेसमेंट टॅक्स लावण्याबाबत म.न.पा.ची काय कार्यपध्दती आहे याची माहिती म.न.पा. अधिका-यांनी पुढील बैठकीत माहिती सादर करावी.

३) मा.मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमीपुजन करण्यासाठी कुठल्या जागा उपलब्ध होतात यांची माहिती घेऊन उपमुख्य अभियंता-पुनर्रचना यांनी भूमीपुजन समारंभाच्या कार्यक्रमाची आखणी करावी.

४) चिखलवाडी येथील पुनर्रचित इमारतीतील उद्‌वाहनास सद्याच्या ॲटोमॅटीक दरवाज्याऐवजी कोलॅप्सिबल दरवाजे बसविण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यांत आला होता त्यावर कार्यवाही कार्यकारी अभियंता विद्युत विभाग यांना करावयाची असल्याने त्यांना पुढील बैठकीत हजर राहण्यास कळविण्याबाबत सूचना केल्या.

५) गाळे हस्तांतरणास असलेली स्थगिती उठविण्याबाबत मंडळाकडून शासनास पत्र देण्यांत यावे.

६) क्लस्टर डेव्हलपमेंटच्या माहितीचे सादरीकरण पुढील बैठकीत करण्यांत यावे.

७) शैलेंद्र नगर, दहिसर याबाबतीत शासनास पाठविलेल्या अहवालाची प्रत उपमुख्य अधिकारी/संगा यांनी मा. सदस्य श्री. व्हि.जी.नायर यांना देण्यांत यावी.

८) ४४-बी मोतीवाला बिल्डिंग या इमारतीस कार्यकारी अभियंता-फग/दक्षिण यांनी भेट देऊन इमारतीच्या पुनर्रचना किंवा पुनर्बांधणी अथवा दुरुस्तीबाबत अहवाल सादर करावा.

९) १९.०७.२००८ रोजी ३३ (९) च्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी एक जोड बैठक ठेवण्यांत यावी.

मा. सभापती यांनी बैठकीच्या शेवटी सर्वांच्या आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर केले.

मा.मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ.

मा.सभापती/दुवपु मंडळ.

## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची शनिवार दि. १९ जुलै २००८ रोजी झालेल्या जोडबैठकीचे कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची जोडबैठक शनिवार दि. १९ जुलै २००८ रोजी सकाळी ११.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. आमदार श्री. सचिन अहिर | सभापती |
| २) | मा. श्री. तानाजी सत्रे | उप सभापती तथा मुख्य अधिकारी |
| ३) | मा.आमदार श्री.बशीर पटेल | सदस्य |
| ४) | मा. श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ५) | मा. श्री. नंदकुमार काळे | सदस्य |
| ६) | मा. श्री. कमरुद्दीन मर्चंट | सदस्य |
| ७) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ८) | मा. श्री. तारीक फारुकी | सदस्य |
| ९) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| १०) | मा.श्री.हेमराज शहा | सदस्य |
| ११) | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| १२) | मा.श्री.हरिष सणस | सदस्य |
| १३) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्य |
| १४) | मा.श्री.सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| १५) | मा.श्री.व्ही.जी.नायर | सदस्य |
| १६) | मा.श्री.शरद शिरीषकर | सदस्य |
| १७) | मा. श्री. दिलीप शिंदे,उपसचिव,गृ.नि.विभाग | निमंत्रक |
| १८) | उपकर निर्धारक व संकलक, म.न.पा. | गैरहजर |
| १९) | निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळाचे सचिव यांनी मंडळाची जोडबैठक सुरु करीत असल्याचे जाहीर केले.त्यानंतर मा. सभापती तसेच उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांनी मंडळावर नियुक्त झालेल्या नवीन सन्माननीय सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

बैठकीच्या सुरुवातीस मा.सभापती यांनी मंडळाच्या नवीन सन्मा. सदस्यांची ओळख करुन दिली. त्या नंतर सर्व नवीन सन्मा.सदस्यांनी स्वतःची ओळख करुन दिली.

**बाब क्रमांक :- १०९/९**

विषय :- विकास नियंत्रण नियमावलीतील कलम ३३ (९) मध्ये शासनाने दि. ३०.०६.०८ रोजी काढलेल्या अधिसूचनेवर हरकती / सुचना देण्याबाबत.

मा.सभापती यांनी महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झालेल्या विकास नियंत्रण नियमावली ३३ (९) च्या सूचनांचे सादीकरणाबाबत सूचना दिल्या व सदर सूचनांमध्ये हरकती/सुधारणा करण्याची अंतीम तारीख ३० जुलै ०८ आहे असे सांगितले. मा.सदस्यांनी आपल्या सूचना कराव्यात, जेणे करुन वेळेमध्ये फेरबदल करुन शासनास कळविणे शक्य होईल.

सर्वप्रथम मा.मुख्य अधिकारी यांनी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या कामकाजाबद्दल थोडक्यात माहिती दिली. त्यानंतर शासनाच्या नगर विकास विभागाकडून प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेबाबत माहिती देताना सन्मा.सदस्यांना काही सुधारणा सूचवावयाच्या असल्यास त्या त्यांनी कळवाव्यात असे सांगितले.

त्यानंतर सादरीकरणाच्या प्रत्येक मुद्यावर सर्व सभासदांकडून विस्तृत चर्चा होऊन पुढे दर्शविलेल्या मुद्यांवर उपसंचालक नगरविकास यांचेकडे हरकती / सुचना दाखल करण्याचा निर्णय घेण्यांत आला.

**ठराव क्र :- १०९/७०५**

विकास नियंत्रण नियमावलीतील कलम ३३ (९) मध्ये शासनाने दि. ३०.०६.०८ रोजी काढलेल्या अधिसूचनेवर विस्तृत चर्चा करुन पुढील प्रमाणे हरकती / सुचना ~~मांडण्याचा निर्णय घेण्यांत~~ आला.

**कलम १.१(i):-** अ वर्गातील इमारतीऐवजी सर्व **उपकरप्राप्त इमारतींचा** समावेश करण्यांत यावा.

**कलम २(a)(i) :-** भाडेतत्वावरील खोलीचे १३.०६.१९९६ पूर्वीचे अस्तित्व सिध्द करण्याकरिता महानगरपालिकेचा सन १९९५-९६ चा निरिक्षण उतारा किंवा न्यायालयाचे आदेश तसेच भाडेकरुंच्या पात्रतेबाबत शासनातर्फे वेळोवेळी जे आदेश देण्यांत येतील त्यानुसार भाडेकरुंची पात्रता ठरविण्यांत यावी.

**कलम ४ :-** सदर कलमात दर्शविलेल्या किमान गालिचा क्षेत्र २७.८८ चौ. मी. (३०० चौ. फूट) ऐवजी ३२.५१ चौ. मी. (३५० चौ.फूट) करण्यांत यावे. तसेच ३२.५१ चौ. मी. ते ७०.०० चौ. मी. (७५३.०० चौ. फूट) पर्यंतच्या गालिच्या क्षेत्रफळाच्या पुनर्वसन क्षेत्रास बांधकाम खर्च आकारण्यांत येऊ नये. ७०.०० चौ. मी. (७५३.०० चौ. फूट) पेक्षा अधिक गालिचा क्षेत्रफळासाठी विकासकाने बांधकामाचा खर्च आकारण्याची तरतुद करण्यांत यावी. बांधकाम खर्च विकासक व संबंधित भाडेकरुंनी आपआपसात ठरवावे.

**कलम १२.२:-** पुनर्विकासाच्या सदनिकेचे क्षेत्र किमान ३२.५१ चौ. मी. (३५० चौ.फूट) करण्याची शिफारस करण्यांत आल्यामुळे स्वयंपाक घराचे किमान क्षेत्रफळ ८०.०० चौ.फूट ठेवण्यास हरकत नसावी.

**कलम १२.४ व १२.५ :-** सदर कलमातील तरतुदी वगळण्यांत याव्यात.

**कलम १६ :-** पुनर्वसनासाठी बांधण्यांत आलेले गाळे १० वर्षे न विकण्याची अट भाडे नियंत्रण कायदा १९९९ च्या तरतुदीस धरुन आहे किंवा कसे यावर विचार करुन शासन स्तरावर निर्णय घेण्यांत यावा.

**कलम १७ :-** पुनर्वसनासाठी आवश्यक असलेले एकूण बांधकाम क्षेत्र विचारात घेवून त्या क्षेत्रासाठी पुढील १० वर्षात देखभालीसाठी येणारा अंदाजित खर्च विचारात घेवून प्रति चौ. फूट दर निश्चित करुन तेवढी रक्कम कॉर्पस फंड म्हणुन जमा करावी.

**कलम १९ :-** प्रस्तावित उच्च स्तरीय समिती समुह विकासाच्या प्रस्तावास तत्वतः मान्यता देईल आणि म्हाडा अधिनियमातील तरतुदीनुसार पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे अधिकार मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे असल्याने पुढील कार्यवाही मंडळाने करावी. त्याचप्रमाणे प्रस्तावित सुधारणामध्ये म्हाडाने संपादित केलेल्या मालमत्तेची पुनर्बांधणी विकास नियंत्रण विनिमय कलम ३३ (९) अंतर्गत करण्यांत येते. मात्र प्रस्तावित सुधारणांमध्ये भुखंडाचे किमान क्षेत्रफळ ४०००.०० चौ.मी. असण्याची अट असल्यामुळे म्हाडाने धोकादायक / दुरुस्ती पलिकडे म्हणुन घोषित करुन पुनर्बांधणी करावयाच्या इमारती सदर विनिमयात मोडत नाही. त्यामुळे म्हाडाने संपादित केलेले ४०००.०० चौ. मी. पेक्षा कमी आकाराचे भुखंड पुर्वीप्रमाणेच विकास नियंत्रण नियमावलीतील कलम ३३ (९) अन्वये करणे आवश्यक ठरते. त्याबाबतीत खालील सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे.

मुंबई बेटावरील म्हाडाने संपादित केलेल्या मालमत्तेची पुनर्बांधणी करतांना ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक किंवा रहिवाशी / भाडेकरु यांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक असलेला चटईक्षेत्र निर्देशांक अधिक ५०% प्रोत्साहनपर चटईक्षेत्र निर्देशांक यापैकी जो जास्त असेल तो अनुज्ञेय करण्यासाठी सुचना पाठविण्याबाबत मुख्य अधिकारी / दुव पु यांनी विचार करुन निर्णय घ्यावा.

मा. सभापती यांच्या मान्यतेने खालील मुद्यांवर चर्चा झाली

मा.सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी विकास नियंत्रण नियमावली ३३ (९) करताना ३३ (७) ला बाधा न आणता करावी, असे सांगितले. यावर विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) मध्ये काही फेरबदल केलेला नाही, असे मा.मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

उमरखाडीयेथील ओंकार इमारतीमधील स्लॅब कोसळून बरेच दिवस उलटून गेलेले आहेत, त्यामध्ये २४ लाखाचे दुरुस्तीचे काम केलेले आहे, आपण काय पाठपुरावा केला अशी सन्मा.सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी विचारणा केली.

यावर मा.मुख्य अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे माहिती दिली. दुर्घटनाग्रस्त इमारतीची दि.27/06/08 रोजी मी मा. श्री.सचिन अहिर, मंडळाचे सभापती आणि श्री.गजेंद्र लष्करी,

सदस्य, मा.श्री.बशीर पटेल, स्थानिक आमदार, मुख्य अभियंता व अन्य अधिका-यांनी भेट देवून पहाणी केली आहे. दुर्घटनाग्रस्त ओंकार इमारत ही सन 1992-93 मध्ये राजीव गांधी झोपडपट्टी सुधार व निवारा प्रकल्प या योजनेंतर्गत भारत सरकारने दिलेल्या अनुदानात बांधलेली आहे. या सर्व इमारती पूर्वी उपकरप्राप्त इमारती असल्याने पुनर्रचनेनंतर सदर इमारतींमधील गाळयांचे भाडेकरु/रहिवाश्यांना मालकी तत्वावर वाटप करण्यात आले आहे. स्थापत्य अभियंत्याची नेमणूक करुन पूर्ण इमारतीच्या संरचनात्मक सुरक्षिततेबद्दल (Structural Stability) पहाणी करण्याचे काम हाती घेण्यात आले असून, इमारतीची तोडफोड न करता चाचणी घेऊन इमारतीचा संरचनात्मक पाहणी अहवाल (Structural Audit Report) 8 दिवसात मिळेल, अशी अपेक्षा आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून इमारतीमधील जे 12 गाळे खाली करणे आवश्यक आहे, त्या 12 गाळयांतील भाडेकरुंना नोटीसा देवून मंडळाच्या विनोबा भावे नगर कुर्ला संक्रमण शिबीरामध्ये त्यांची पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. तथापि, या सर्व भाडेकरुंनी ओंकार इमारतीच्या आसपास मंडळाने बांधलेल्या पुनर्रचित इमारतीमध्ये त्यांची तात्पुरती व्यवस्था करावी, अशी विनंती केलेली आहे. मंडळाच्या पुनर्रचित इमारतीमध्ये अशा प्रकारे सोय करणे शक्य नसल्याचे या रहिवाश्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येवून, त्यांना संक्रमण शिबीरात जाण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे.

सन्मा.सदस्य आमदार श्री.बशीर पटेल यांनी यावर अशी विचारणा केली की, स्ट्रक्चरल स्टॅबीलीटी रिपोर्ट यावयास एवढा कालावधी का लागत आहे, त्यांचे अजून संक्रमण शिबीरात स्थलांतरण का करण्यात आले नाही.

मा.सभापती यांनी पुढे असेही सांगितले की, 24 लाखाचे काम केलेल्या कंत्राटदाराची चौकशी करुन त्याचे नाव ब्लॅक लिस्टमध्ये टाकले पाहिजे. इमारतीची आतून दुरुस्ती का केली गेली नाही याची चौकशी केली पाहिजे. संबंधित अधिका-यांचा अहवाल आपल्यासमोर ठेवून त्यावर निर्णय घ्यावा. तसेच स्ट्रक्चरल स्टॅबीलीटी रिपोर्टला विलंब का लागला याचीही विचारणा करावी. रहिवाशांना संक्रमण शिबीरात हलविले पाहिजे, परंतु त्यांना प्रतिक्षा नगर येथे पाहिजे आहे काय? ज्यांना पुनर्रचित इमारतीत पाहिजे आहे, तेथे त्यांना देणे शक्य होणार नाही.

सन्मा.सदस्य आमदार श्री.बशीर पटेल यांनी संक्रमण शिबीरात घुसखोरी वाढलेली आहे, अशी तक्रार केली.

उपमुख्य अधिकारी (सं.शि.) यांनी किती घुसखोरी झालेली आहे, ते तपासून सांगतो असे प्रतिपादन केले.

तसेच काही ठिकाणी मुदत संपून देखील त्यांनी संक्रमण शिबीरातील गाळे खाली केलेले नाहीत, असे सांगितले.

~~ज्यांनी ज्यांनी~~ मुदत संपल्यानंतरही गाळे सोडलेले नाहीत, ते सर्व गाळे ~~जप्त करून~~ घ्या असे मा.मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

23

मा.सभापती यांनी सन्मा.सदस्या श्रीमती उल्का पाटकर यांच्या बोटावाला चाळीबद्दल योग्य ती कार्यवाही करण्याबाबत उपमुख्य अधिकारी (सं.गा.) यांना सांगितले.

बैठकीच्या अखेरीस मा. सभापती यांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्य व अधिका-याचे आभार मानून आजची बैठक संपल्याचे जाहीर केले.

मा.मुख्य अधिकारी, मुं.इ.दु.व पु.मंडळ

मा.सभापती,मुं.इ.दु.व पु.मंडळ